# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 16/07/2020 (गुरूवार)

(दुपार)

---

### जबरी संभोग

पो.स्टे. बेला :– दिनांक 01/03/2020 चे 00.00 वा. ते दिनांक 15/07/2020 या दरम्यान फिर्यादी, त्यांचा पती व त्यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी पीडित हे तिघेही सिर्सी ते गिरड रोडचे मजुरीचे कामाला रोडचे बाजुला झोपडी बांधुन राहत होते. फिर्यादी व त्यांचे पती रोडच्या कामाला गेल्यानंतर 20 ते 25 वयोगटातील अनोळखी मुलगा आरोपी याने फिर्यादीच्या अल्पवयीन मुली सोबत ओळखी करून तिचा विश्वास संपादन करून शारीरिक संबंध प्रस्थापीत केले. यानंतर पीडिता हि चार महिन्याची गर्भवती झाल्याने फिर्यादी व पीडित मुलीचे बयानावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 376 (2),(एन) भादंवि. सहकलम 4, 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार गणेश पाल 9552517268 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कळमेश्वर – पो.स्टे. कळमेश्वर हद्यीत फिर्यादी यांची 17 वर्षीय बहीणी हि फिर्यादी बहीणी कडे राहत होती. दिनांक 15/07/2020 चे 09.00 वा. चे सुमारास अज्ञात आरोपीने तिचा अज्ञातपणाचा गैरफायदा घेवुन फुस लावून पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार निरंजन गवई 9860889550 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर